नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०७/०३/२०२६ (शनिवार )

## शाळकरी अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा
## पोलीसांनी सदर प्रकरणाची स्वत: दखल घेत फिर्याद देवुन केला होता गुन्हा नोंद
## नागपुर ग्रामीण जिल्हयातील नविन फौजदारी कायदयाअंतर्गत झालेली पहीलीच मोठी दोषसिध्दी (शिक्षा) आहे.

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— पोलीस उपनिरीक्षक श्री किरण महागावे, नेम. भिवापुर पोलीस स्टेशन यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भिवापुर येथे अप क्र. ४४२/२०२४ कलम ७४,७८,७९ भान्यासं सहक. ८, १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

**सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील आरोपी नामे मंगेश भालचंद्र धनविजय, वय ३४ वर्षे, रा. कोलारी हा सदर गुन्हयातील अल्पवयीन पिडीतांचा नेहमी पाठलाग करत होता तसेच पिडीत मुली शाळेत जाण्यासाठी बस मध्ये चढल्या की, तो त्यांच्या मागे बस मध्ये चढुन त्यांना अश्लिल स्पर्श करून त्यांचा विनयभंग करीत होता. दिनांक २१/०९/२०२४ रोजी सकाळी ०७:०० ते ०८:०० वाजेच्या दरम्यान एका पिडीत मुलीने आरोपीला हटकले असता आरोपीने पिडीत मुलींना अश्लिल शिवीगाळ आणि इशारे केले त्यानंतर सर्व पिडीता या भिवापुर कोर्ट समोर बस मधुन उतरल्या. अशी माहीती भिवापुर पोलीसांना प्राप्त झाली होती. भिवापुर पोलीस सदर माहीती प्राप्त होताच तात्काळ घटनास्थळी भिवापुर कोर्टसमोर पाहचले. पोलीसांनी स्वत: सदर प्रकरणाची संपुर्ण चौकशी करून १३ पिडीत अल्पवयीन मुलींचे बयान नोंदविले आणि सरकारतर्फे फिर्याद देवुन वर प्रमाणे गुन्हा नोंद केला.**

श्री जयप्रकाश निर्मल , सहा. पोलीस निरीक्षक, नेमणुक पोलीस स्टेशन भिवापुर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ०७/०३/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ३ श्री एस. एच. ग्वालानी यांनी नमुद आरोपी मंगेश भालचंद्र धनविजय, वय ३४ वर्षे, रा. कोलारी यास १) कलम ७४ भान्यासं मध्ये १ वर्ष सश्रम कारावास, व २००० /— रू. दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास , २) कलम ७८ भान्यासं मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १००० /— रू. दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास , ३) कलम ७९ भान्यासं मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १००० /— रू. दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास , ४) कलम ३५१(२) भान्यासं मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व २००० /— रू. दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास ५) कलम ८ पोक्सो मध्ये ३ वर्षे सश्रम कारावास व ५००० /— रू. दंड , दंड न भरल्यास २ महीने साधा कारावास, आणि ६)कलम १२ पोक्सो मध्ये १ वर्षे सश्रम कारावास व १००० /— रू. दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणी आरोपीस झालेली शिक्षा ही नागपुर ग्रामीण जिल्हयातील नविन फौजदारी कायादयाअंतर्गत झालेली पहीलीच मोठी दोषसिध्दी (शिक्षा) आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती कल्पना पांडे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री जयप्रकाश निर्मल, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापुर, सपोनि श्री विशांत नांदगाये, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन श्रेणी पोउपनि तुलाराम खडसे, पोलीस स्टेशन भिवापुर यांनी मदत केली आहे.

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी गुन्हयामध्ये सहभाग असलेल्या ३ आरोपीतांच्या आंतरराज्यीय टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावला आहे

पोलीस स्टेशन कन्हान :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात कन्हान पोलीसांनी अवैध अंमली पदार्थ गुन्हयामध्ये सामील असलेल्या आरोपीतांच्या आंतरराज्यीय टोळीचा प्रमुख आणि सदस्य अशा एकुण ३ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे ०१) अमित रामदीन रयकवार, वय ३४ वर्षे, रा.करवी, ता.करवी जि.चित्रकुट, (उत्तर प्रदेश) हा असुन टोळी सदस्य ०२) अमितेंद्र उर्फ जितू जयकरणसींग यादव, वय २८ वर्षे, रा. एच पी पेट्रोल पंप जवळ, यादव डेरा, ग्राम पैलानी , ता.पैलानी जि. बांदा ( उत्तर प्रदेश ) नागपुर आणि अजुन एक आरोपी आहे.**

दिनांक ०७/०१/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक यांनी कन्हान पोलीसांसह सयुंक्तीक कारवाई करत पोस्टे कन्हान हद्दीतील टेकाडी उडाण पुला जवळील ,हनुमान मंदिर बस स्टॉप जवळ आरोपी नामे १) अमीत रामदीन रयकवार, वय.३४ वर्षे, रा. रा.करवी, ता.करवी जि.चित्रकुट, (उत्तर प्रदेश) , २) अमितेंद्र उर्फ जितु जयकरणसिंह यादव, वय. २८ वर्षे, रा. एच.पी.पेट्रोलपंप जवळ, यादव डेरा, ग्राम पैलानी ,ता. पैलानी , जि.बांदा , राज्य उत्तरप्रदेश यांना **२४.२५० किलोग्रॅम अंमली पदार्थ गांजा सह पकडले होते. सदर प्रकरणी नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ८ (सी) ,२० (बी) (२), २९ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली होती. पोलीसांनी सखोल तपास करून गुन्हयात अनेक बाजुंची उकल करून, साखळी पुरावे जोडुन अंमली पदार्थ पुरवठा व विक्री करणारे इतर आरोपीतांचा नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले.**

पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन नमुद टोळी ही आंतरराज्यीय टोळी आहे. टोळीचा प्रमुख अमीत रामदीन रयकवार हा आहे. टोळी प्रमुख याचेवर चित्रकुट जिल्हा राज्य उत्तरप्रदेश येथे जबरी चोरी, खुन, अवैध हत्यार बाळगणे असे अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद आहे. तसेच टोळी सदस्यांवर सुध्दा अवैध अंमलीपदार्थ तस्करीचे गुन्हे नोंद आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचेवर गुन्हे नोंद

करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**कन्हान पोलीसांनी नमुद ३ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**



**आरोपी अमीत रामदीन रयकवार**



आरोपी अमितेंद्र उर्फ जितु जयकरणसिंह यादव

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध अंमली पदार्थ गुन्हयामधील सक्रीय तसेच वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या ३ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावला आहे

पोलीस स्टेशन बुटीबोरी:— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात बुटीबोरी पोलीसांनी अवैध अंमली पदार्थ गुन्हयामधील सक्रीय तसेच वर्चस्व निर्माण करून दहशत पसविणाऱ्या आरोपीतांचा टोळी प्रमुख आणि सदस्य अशा एकुण ३ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे ०१) शुभम वामनराव ढोबळे, वय २६ वर्ष,रा. प्लॉट नं. ११०, चंद्रमणी नगर, नागपुर हा असुन टोळी सदस्य ०२) जयेश राजेश नगराळे, वय १९ वर्ष, रा. प्लॉट नं. १०, चंद्रमणी नगर, नागपुर आणि अजुन एक आरोपी आहे.**

दिनांक २५/०१/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक यांनी बोरी पोलीसांसह सयुंक्तीक कारवाई करत **आरोपी १) शुभम वामनराव ढोबळे, वय. २९ वर्षे, २)**

**जयेश राजेश नगराळे, वय. १९ वर्षे, दोघे रा. चंद्रमणी नगर, अजनी, ता.जि.नागपुर** यांना पोलीस स्टेशन बुटीबोरी पोलीस स्टेशन हद्दीत वाकेश्वर फाटा ,नागपुर ते चंद्रपुर रोडवर अंमली पदार्थ २३. ८४ ग्रॅम मेफेड्रोन पावडर सह पकडले होते. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली. पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख शुभम वामनराव ढोबळे हा आहे. टोळी प्रमुख हा परिसरात त्यांचे टोळीची दहशत पसरविण्यासाठी टोळीच्या सदस्यांसह चोरी, जबरी चोरी, खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, प्राणघातक शस्त्र बाळगणे, गैरकायद्याची मंडळी जमविणे, गंभीर दुखापत, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी, अवैध्यरित्या अंमली पदार्थाची विक्री करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतात. नमुद टोळीचा प्रमुख शुभम वामनराव ढोबळे याचे वर पोलीस स्टेशन बुटीबोरी, नागपुर शहर अंतर्गत अजनी, अंबाझरी येथे एकुण ७ गंभीर गुन्हे दाखल आहे. आरोपी शुभम वामनराव ढोबळे याने आपले टोळी मध्ये नव नविन सदस्यांना घेवुन यापुर्वी सुध्दा नागपूर ग्रामीण व नागपुर शहर जिल्हयातील विवीध पोलीस स्टेशनचे गंभीर गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**बुटीबोरी पोलीसांनी नमुद ३ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**



शुभम वामनराव ढोबळे



**जयेश राजेश नगराळे**

## पेपरफुटी प्रकरणात अजुन एक आरोपी अटक

**पोलीस स्टेशन उमरेड :—** इयत्ता १२ वीच्या पेपरफुटी प्रकरणात पोलीस स्टेशन उमरेड येथे अप क्रमांक ३५०/२०२६ कलम ६ महाराष्ट विदयापिठाच्या , मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षा मध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम १९८२, सह कलम ६१(२), ३१६(५) भा न्या सं अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. **सदर गुन्हयाचे तपास कामी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या नेतृत्वात ५ सदस्यीय विशेष तपास पथक गठित करण्यात आले आहे.**

सदर गुन्हयात टार्गेट ॲकॅडमी सायन्स ऑफ उमरेड चे संचालक अतुल जगन चौधरी, रा. प्लॉट क्रं ११०, भांदारकर ले आउट, उमरेड याला अटक करण्यात आली होती. नमुद गुन्हयात सेवानिवृत्त प्राध्यापक आरोपी सतिष मुकंद खर्चे रा. विकास कॉलनी, उमरेड यांचा सुध्दा सहभाग असल्यााची माहीती तपास पथकाला प्राप्त झाली. आरोपी सतिष खर्चे हे सेवेत असतांना महाराष्ट्र राज्य माध्यामिक व उच्च माध्यमिक, विभागिय मंडळ येथे त्यांची काही वर्षापुर्वी इयत्ता १२ वीच्या रसायनशस्त्राची प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती. आरोपी अतुल जगन चौधरी आणि सतिष खर्चे हे एकमेकांना पुर्वीपासुन ओळखतात तसेच विशेष तपास पथकाला तपासादरम्यान तांत्रिक पुराव्यावरून दोन्ही आरोपी हे एकमेकांच्या सतत संपर्कात असल्याची माहीत प्राप्त झाली. त्यामुळे **सदर गुन्हयामध्ये आरोपी सतिष मुकुंद खर्चे, वय ६९ वर्षे, रा विकास कॉलनी, उमरेड, सेवानिवृत्त प्राध्यापक यांना आज दिनांक ०७/०३/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या परराज्यीय अरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## १ आरोपी अटक, अग्निशस्त्र, २ काडतुस जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०६/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभगात अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती मिळाली की, जयतगढ शिवारातील केळवद ते छिंदवाडा रोड वरील वाघ मामा ढाबा समोर एक इसम स्वत:जवळ अग्निशस्त्र बाळगुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत आहे. नमुद माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले असता एक संशयित इसम मिळुन आला. पोलीसांनी त्याला नाव पत्ता विचारले असता त्याचे शिवलाल धवलसिंग चव्हाण,वय २६ वर्षे, रा. पाचोरी, ता खकणार, जि बुऱ्हाणपुर अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांना पंचासमक्ष आरोपींची झडती घेतली असता आरोपीच्या कमरेला देशी बनावटीचे माउजर आणि त्याच्या खिश्यामध्ये दोन २ जिवंत काडतुसे मिळुन आली. सदर अग्निशस्त्राच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी बनावटीचे माउजर किंमती ४०,०००/— रूपये, २) २ जिवंत काडतुसे किंमती २०००/— रूपये असा एकुण ४२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपींविरूद्ध पोस्टे केळवद येथे कलम ३/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.**





## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## वाहनासह २५ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## २ आरोपी अटक
## पोलीस स्टेशन बेला यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०७/०३/२०२६ रोजी बेला पोलीस शिरसी ते बेला रोडवर पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे

पोलीसांनी मौजा कळमना फाटा येथे नाकाबंदी केली असता ट्रेलर क्र. एम एच २७ बी एक्स—८७५३ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आ**ढळुन आली. वाहन चालक आरोपी क्रं १) गुलाब मुटून पाल, वय ३४ वर्षे, रा. चांदुर खडकी, जि. अकोला त्याच्या साथीदार २) रोहन श्रीकृष्ण मेहेंगे, वय २२ वर्षे, रा. सोमठाणा, जिल्हा अकोला हे मिळुन आले. त्यांना वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक आरोपी क्रं ३) दीपक वासुदेवराव तायडे, रा.चांदूर, जि. अकोला** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी आरोपीतांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. वाहन चालकाने माहीती दिली की, वाहन मालक यांच्या सांगण्यावरून अवैधरित्या रेती साखरा जिल्हा गडचिरोली येथून अकोला येथे घेऊन जात असल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **१) ट्रेलर क्र. एम एच २७/बी एक्स ८७५३ किंमती २५,००,०००/—रूपये २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण २५,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे बेला येथे कलम ३०३ (२), ४९ भा.न्या.सं २०२३, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी नमुद गुन्हयातील आरोपी क्रं १) आणि २) यांना अटक केली आहे.**




## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये २ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन देवलापार :—** दिनांक ०६/०३/२०२६ रोजी देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना २१.०० वा. ते २१.३० वाजेच्या दरम्यान **आरोपी नामे नावेद पिरखान पठान, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र ०१, संजय नगर देवरी जि. गोंदीया आणि २) जावेद शाबीर खान वय ३३ वर्ष रा. कसाई मंडी पानीवाल ता. जि.जबलपुंर मध्य प्रदेश** हे मौजा मोरफाटा, दर्गा परिसर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी १ असे २ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक ०६/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण ६७,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे १) विक्की आत्माराम डहाके, वय २५ वर्षे, रा. म्हसली, ता. कुही ,२) मुकेश चिंतामण नागोसे, वय ४७ वर्षे, रा. पचखेडी यांचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) अंकुश दयाराम टेकाम, वय २४ वर्षे, रा. सारडी, ता. नरखेड २) अनिल मंगलसिंग धुर्वे, वय ३५ वर्षे, रा. गोधनी, त. नरखेड याचे वर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे मुकेश दिलीप कोरचाम, वय २७ वर्ष, रा. बच्छेराए, तह. पारशिवनी, जिल्हा. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) आझादसिंग हरभजनसिंग बावरी, वय २२ वर्ष २) पालेंद्रपुरी भुवनपुरी मुलतानी, वय २७ वर्ष, दोन्ही रा. वार्ड क्र. ३, रूईखैरी, ता. जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी एक गुन्हा नोंद, अशा ०५ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) २० लिटर मोहाफुल गावठी दारू, २) ४५७२० मिली देशी दारू तसेच वाहन असा एकुण ६७,७००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०७/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार

गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७३७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २८ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ८० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने